म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. १०५०१

[ ४ थें.

# स्वकुळ साळी युवक मेळा.

१२१ गंज पेठ, पुणें नं. २.

## पद्यावली

५०६२



सन १९३८

प्रकाशकः—एस. आर. जिंदे, १२१ गंज पेठ, पुणें २.

...यण संतराम जमदाडे,
...४३३ बुधवार पेठ, पुणें २.

REFBK-0005762
REFBK-0005762

किंमत १ आणा.

गणेश उत्सवा निमित्त मुद्दाम कमी केलेले दर.

Maharashtra
LAXMI ROAD ART BEL BAG.

स्वस्त

# — फोटो —

REFBK-0005762
REFBK-0005762

म्हणजचे

फक्त १॥ रुपयांत ३ निरनिराळे पोस्ट कार्डस.

कोठें मिळतात ?

# महाराष्ट्र आर्ट स्टुडिओ

लक्ष्मी रोड, पेट्रोल पंपासमोर, पुणें शहर.

सिनेमा स्लाईडस्

एन्लार्जमेंटस्

पेंन्टिंग्ज्

वगैरेबद्दल चौकशी करा !

मेळयाच्या फोटोकरतां स्पेशल कन्सेशन.

# गैरसोय दूर झाली.

लहान लहान शहरांतून उत्तम पेन्टरचे अभावीं होतकरू पेन्टर-कडून हलक्या रंगाच्या व वेड्यावांकड्या अक्षरांच्या पाट्या (साईन बोर्डस्) करवून घेणें भाग पडतें. अशी गैर-सोय पाहून महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे (पहिले व फक्त १ च) अनेक संस्था व सद्गृहस्थां-कडून गोल्ड मेडल व सर्टिफिकेटस् मिळालेले बुधवार चौक पुणें येथील

## सतत वीस वर्षें अग्रगण्य व मराठी वळणाचे स्पेशालिस्ट

# पेन्टर ए. जी. बेडेकर.

फर्स्टक्लास साईनबोर्ड, ॲन्ड पिक्चर पेन्टर सिनेमा स्लाईडस् व रबर स्टँपमेकर ब्रासएन्ग्रेव्हर, डिझाइनर, ग्लासडेकोरेटर, ॲन्ड परमनंट कॅलेंडरस् (मॅन्युफॅक्चरर)

## बुधवार चौक पूना २ (सिटी) हे

बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोष्टानें काळजीपूर्वक व वेळेवर पाठवितात.

तरी ह्या सोईचा अवश्य फायदा घेऊन आपला वआमचा अवश्य फायदा करा.

## पेन्टर बेडेकर बुधवार चौक पुणें सिटी

## यांचेकडे तयार होणारा व मिळणारा माल.

लांकडी, पत्र्याचेवूडन एनग्रेव्हड व एम्ब्राजडलेटरर्सचे रियलगोल्ड
अ‍ॅन्ड सिल्व्हरचे फर्स्टक्लास साईनबोर्ड, पिक्चर पेन्टींग,
ग्लासडेकोरेटींग तसेंच फॅन्सी गोल ओव्हल व नक्षीचे

## हायक्लास रबरी शिक्के,

## अ‍ॅट्रॅक्टीव्ह सिनेमा स्लाईडस्

ब्रासलेटर्सचे साईनबोर्डस (पितळी सिल्स, शिपायांचे बिल्ले वगैरे - ब्रास एनग्रेव्हींगचीं सर्वकामें, तसेंच टेलर्स व क्लाथ मर्चंटकरितां सॅल्यु) लेट व कांचेवरील फॅशनदर्शक पिक्चर्स सतत चालणारी पत्र्याची पर्मनन्ट कॅलेंडर्स, इनअऊट बोर्डस्, लेटरबॉक्सेस् मालाचे जाहिरातीकरितां अ‍ॅट्रॅक्टीव्ह पिक्चर्स, जर्मन रिव्हालिंग डेटर्स, ब्रिटिश नंबरींग स्टॅम्प्स् तसेंच हरतऱ्हेचे रेडीमेड स्टॅम्प्स्, स्टॅम्प्स् पेडस्, स्टॅम्पईंक, डेटर्स, वगैरे हरतऱ्हेचे रबरस्टॅप विषयक सर्व सामान खात्रीचें व योग्य किंमतींत मिळतें

**विनंती:**—उच्च दर्जाची सर्वकामें आम्हीं स्वत: करित असल्यामुळें घरोघर फिरण्यास आम्हांस वेळ मिळत नाहीं. तरी ऑर्डर्स आमचे दुकानीं येऊन दिल्यास फारच मेहेरबानी होईल.

**जादा माहितीसाठीं समक्ष भेटा अगर पत्रव्यवहार करा.**

**पत्ता:--पेन्टर ए. जी. बेडेकर**

**बुधवार चौक, पुणें २ (सिटी.)**

जुन्या कपड्यांचें नव्यांत रुपांतर म्हणजेच

# सूर्य विजय लॉन्ड्रींत

कपडे देऊन खात्री करा.

आमचेकडे सिल्क, उलन, जरीचे ड्रायक्लीनिंग व डाईंगचे काम मनपसंत करून मिळेल.

पत्ताः—१५९६ शुक्रवार गेटासमोर, पुणें २.

मालकः— पांडुरंग धोंडिबा पवार.

---

# समीर गज केसरी

## ही एक महावीर मात्रा आहे.

स्वप्नावस्था, धातु पातळ, अशक्तता ही दूर करून धातूची वृद्धि करणार. ८० प्रकारचे वातरोग, अतिसार, आंम अतिसार—आमस्मार व स्तवंकही. जेथे चमत्कार तेथें नमस्कार. अशी चमत्कार दाखवून नमस्कार घेणारी खरोखर ही मात्रा आहे. शास्त्रोक्त पद्धतीनें वडिलोपार्जित खाले-खाल २२ वर्षांनीं अनुभव येत आहे.

याशिवाय प्रत्येक रोगावर रामबाण औषध मिळेल.

विषेष माहिती करतां समक्ष भेटणें.

पत्ताः—वैद्य कृष्णासा आर. सिद्ध. ७९५ गंज पेट, पुणें.

पन्नास वर्षांची प्रतिष्ठा हेंच प्रामाणिकपणाचें सर्टिफिकेट

लक्षांत ठेवा. ]—[ पत्ता बदलला.

# पंड्या साभलदास वजेराम

स्पेशालिस्ट राघवदासवाले

फुलवाला चौक वेताळ पेठ पुणें, रे. न. ७७७

सर्वांत उत्तम श्रीखंड, बासुंदी, बर्फी व इतर तुपाची मिठाई

ताजी व स्वस्त मिळेल.

---

जिव्हेश्वर प्रसन्न

# केंदळे ॲन्ड ब्रदर्स

आमच्या येथें हातमागास लागणारें शटल व पिंजरे ( Dobby )

तयार करून स्वस्त भावांत मिळेल, व रिपेअर सुद्धां

उत्तम रितीनें केलें जाईल. व बाहेर गांवच्या ऑर्डरीवर

पूर्ण लक्ष्य दिलें जाईल. नवीन तऱ्हेचे डिझाईन्सचे

पिंजरे ऑर्डरीप्रमाणें तयार करून मिळेल.

गरजुंनी उत्तम संधी न दवडतां खालील पत्त्यावर

समक्ष भेटणें, अगर लिहीणें.

पत्ता:—बी. डी. केंदळे ॲन्ड ब्रदर्स.

७८५ गंज पेठ, पुणें नं. २

अवश्य या ! व पहा !!

# जाहीर विनंती

आमचे दुकानीं सर्व तऱ्हेचीं लुगडीं व पातळें ( साधी व जरीची ) वगैरे नवीन डिझाइन्सचा माल किफायतशीर भावानें मिळेल.

## एकवेळ अनुभव घेऊन खात्री करा.

टीप:----पुढील वार्षिक बक्षिसीच्या आशेला मोहूं नका. मोटारीसारख्या मौल्यवान वस्तूला पाहून फसूं नका.

## पत्ता:-- जयनारायण राठी,

क्लॉथ मर्चन्ट.

घ. नं. ५७३ रविवार पेठ, कापडगंज, बढाई आळी,

चौकानजीक, पुणें नं. २.

## पांडुरंग विठोबा धार्मिक

यांचा

## हातमागावरील कापडाचा कारखाना,

७९० गंज पेठ, पुणें शहर.

आमचे येथें चंदेरी, बडोदा, खंबायत महेश्वरी, रेशमी व सुती जरी किनारीचीं उंची पोताची ८०।१२० नं. सुताची लुगडी व दंडिये मिळतील. विशेष माहितीकरितां समक्ष भेटा.

**ऑर्डरीप्रमाणें मनपसंत माल काढून मिळेल.**

---

खात्रीचा व फायदेशीर माल

— रंग विटल्यास परत अशी —

# लेखी गॅरंटी

एकदां प्रत्यक्ष येऊन खात्री करा

## पुण्यांतील प्रसिद्ध दुकानः----

## जगन्नाथ लक्ष्मीनारायण राठी,

## कापडगंज, सोमेश्वराचे देवळाजवळ. पूणें.

आमचेकडे बनारसी, कोईमतुरी शालू, पटके, रुमाल, जरीची लुगडीं व खण, इलकली लुगडीं व इतर तऱ्हेचा सर्व माल फायदेशीर भावांत मिळेल.

# उडपी

## श्री लक्ष्मी निवास कॉफी हाऊस,

## बाहुलीचे हौदासमोर,

### घ. नं. २१८ बुधवार पेठ, पुणें २.

इडली, दोसा, वगैरे उत्तम प्रकारचा स्वच्छ व ताजा माल माफक दरांत मिळण्याचें एकच ठिकाण.

---

## आर. जी. सांगळे

### ८०२ गंज, पुणें २.

आमच्या कारखान्यांत तयार होणारा मालः—

बनारस नमुन्याचे शालू, शेले, ब्लाउजपीस, खण, कद व पुणेरी जरीकाठी पैठण्या, शेले, पितांबर, खण वगैरे.

तसेंच

चंदेरी, बडोदा, खंबायत महेश्वर नमुन्याची जरीकिनारीचीं रेशमी व सुती उंची पोताची गंडेरी व लुगडीं, सूत नंबर ८० ते १२० रुंदी ५० ते ६० इंच व लांबी ९ ते १० वार, रंग पक्का, अशीं तयार होतात.

त्याचप्रमाणें

वाटेल त्या नमुन्याचें भरतकाम रेशमी, जीगसम्ल्याचे हँड पेन्टिंगचें व आरीचें तयार असतें.

एकवेळ अनुभव घेऊन पहाणें.

## 'स्वकुळ साळी युवक'

### मेळ्याचे चालक



एस्. आर. जिंदे.

---


पुण्याचे प्रख्यात राघवदासवाले

फक्त १ च

लक्ष्मीरोड पुणें २

**पंड्या ब्रदर्स**

मिठाईवाला.

राघवदास, बर्फी, पेढे, श्रीखंड

बासुंदी वगैरे मिळण्याचे

केंद्रस्थान

या व खात्री करा

मुख्य दुकान

वेताळ पेठ, सुंदर

बालाजी समोर

पुणें २

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# प्रस्तावना.

सालाबादप्रमाणें यंदाही श्रीगजानन कृपेंकरून " स्वकुळ साळी युवक मेळा " जनताजनार्दनाचें सेवेसाठीं निघाला आहे. मेळ्यांतील पदें नवीन चालींची व उद्बोधक अशी असल्यामुळें मागील २-३ वर्षांप्रमाणें याही वर्षीं मेळ्याचें कार्यक्रम लोकप्रीय होतील अशी आम्हास आशा आहे. श्री. स. ना. दातार यानी आम्हास आयते-वेळीं समाजसेवक हा संवाद सादर केला याबद्दल त्यांचें व त्याच-प्रमाणें कवी श्री. एम्. डी. वैद्य, श्री. अ. दि. वेल्हाळ, श्री. द. वि. क्षीरसागर, प्रमोद, श्री. ए. के. ठाकुरदास, व श्री. दत्तोबा शिंदे यांनीं आम्हास पदें तयार करून देऊन जे दरसाल निरपेक्ष सहाय्य करीत आहेत. याबद्दल त्यांचे आम्ही फार आभारी आहोत.

पुणें,<br>ता.२८-८-३८.

आपला नम्र,<br>एस्. आर. जिंदे.

---

# गाणारीं मुलें

१ विठ्ठल सगरी, २ ग्यानबा नालवार,<br>
३ कृष्णा कल्याण, ४ टी. उखरडे,<br>
५ नारायण कल्याण, ६ शंकर एकबोटे,<br>
७ जगन्नाथ कल्याण, ८ श्रीहरी हुबळी,<br>
९ कृष्णा सपार.

# स्वकुळ साळी युवक मेळा.

## पद्यावली १९३८

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
ठाणे.



पद १ लें. ( चाल–गोपाळकृष्ण. )

शिशुगण नमति विजया भावें ।
सुखवित सुरजन सकल जगाला भूषण व्हावें ॥ धृ. ॥
सुरेश सुदंत सुखातरंगा ।
पदनत वांच्छित साळी स्वकुळा ।
अंतरंग राजस राणा ।
गाऊनि मानस तोषले–वाहिले ॥ १ ॥

एम्. डी. वैद्य.

---

पद २ रें. ( राग–खंबायती, ताल–त्रिताल. )

मनमोहना नाहीं तुजवीणा जगतांत अखिल ही या आम्हां ॥धृ.॥
आर्जी काय येई श्रवणीं तुझीया, ही हांकरे सदया आम्हां ॥१॥

ए. के. ठाकुरदास.

### पद ३ रें ( चाल–वंदित राधा बाला . )

संगित साधन सकलां, आळविण्या प्रभु लीला ।
मोहक मंदिरीं मंगल धार ।
मूर्ति भासती साक्षात्कार ।
जणूं भाग्याचें हे सरदार ।
मोहवी रविकर सकलां, मंगलमय स्वरुपाला ।
कृपा करी, सत्व धरी ।
परिसुनी हांका–धांवत ये जगताला ॥ १ ॥

एम्. डी. वैद्य.

---

### पद ४ थें. ( चाल–बालक आये )

हे मयुरेश सुमंगल देवा मानव जीवा ।
तूंची विसांवा अंत न पाहावा । अभय असावा ॥ धृ. ॥
संकटीं हिंद असे आज सारा ।
ठेवी कृपेची पाखर आसरा ।
होऊनि दीन आलो तव द्वारां ।
प्रभुजी अंत न पाहावा ॥ १ ॥

द. वि. क्षीरसागर.

---

### पद ५ वें. ( राग–दुर्गा, ताल–त्रिताल. )

मनमोहन प्रभुगणराया, कुणी दावा मजला ॥ धृ. ॥
लपला कोठें गणया आतां भेटी सत्वरी मजला ॥ १ ॥

ए. के. ठाकुरदास.

पद ६ वें. ( रागः—पटदीप, तालः—त्रिताल. )

हत भागिनी ही ।
प्रेमा विमला बाला ॥ धृ. ॥
सुगुणा गुणा गाया सुमनें कशाला ? ॥१॥

एम्. डी. वैद्य.

---

पद ७ वें. ( चालः—मन सुद्ध तुझें.)

चल ऊठ गड्या सोड अतां भ्रांति जिवाची ।
सोड आळस शपथ तुला मायभूमीची ॥ धृ. ॥
घेऊनीया जन्म विरा उदरीं जिच्या तूं ।
ठेऊनी परदास्य तिला स्वस्थ कसा तूं ॥
भारतीचा तूंचि हीरा फेड रुणाची ।
करूनी देई मुक्त माई आज जगाची ॥१॥
तुजसम नरवीर जिच्या पोटीं जन्मले ।
धिक्‌धिक् तुझें व्यर्थ जिणें शरम मनाची ॥
ठेवी जरा तरुण वीरा मायभूमीची ॥२॥

द. वि. क्षीरसागर.

---

पद ८ वें. ( राग–गरूडध्वनी, ताल–त्रिताल. )

झणीं उठ रे नवयुवका तरुणा ।
स्वस्थ कां बैसला ॥ धृ. ॥
भंगली ती कृष्ण वेळा ।
दाही दिशा बघ दिसती सुंदर ॥
दीनमणी उगवला ॥ झणीं ॥ १ ॥

कार्य करण्या ऊठ तरुणा ।
स्वातंत्र्याचा घे करीं झेंडा ।
फडकवी आजला ॥ झणीं ॥ २ ॥
संपलें परदास्य आपुलें ।
समरांगणीं चल मायभुमीच्या ।
तोडूं आज शृंखला ॥ झणीं ॥ ३ ॥

द. वि. क्षीरसागर.

---

पद ९ वें ( राग–मांड, ताल–केरवा. )

नंदलाला गोपाला या झडकरी धावत या ॥ धृ. ॥
लाज राखी द्रौपदीची दुष्ट छळतो मम देहासी ।
धावोनी पावोनी सोडवी रे मजला ॥ १ ॥

ए. के. ठाकुरदास.

---

पद १० वें. ( चालः—मुझे क्या काम )

जगींया पूज्य संस्थान । धरा कॉंग्रेस अभिमान ॥ धृ. ॥
अनाथा नाथ करण्यासी । कळेना युक्ति कवणासी ।
म्हणूनी त्या राष्ट्र वीरानें । शोधिला मार्ग हा छान ॥
धन्य ते धन्य हो वीर । तळहातीं घेऊनी शीर ॥
जमुनी या शांति समराला । दिलें महाराष्ट्र जीवदाना ॥ १ ॥
स्पृश्य अस्पृश्य हा काटा । काढुनि खुलविल्या वाटा ।
ऐक्यता मंत्र शिकवोनी । मिळविला कौन्सिलां मान ॥
बंधुनों शपथ घ्या आतां । ऊठा घेण्यासी निजसत्ता ।
पूज्य कॉंग्रेस मनीं धरितां । मिळऊं स्वातंत्र्यता, स्वधना ॥२॥

द. वि. क्षीरसागर.

पद ११ वें. ( राग—मीश्र पीलु, ताल—केरवा )

सुविद वद कोणा कल्पना ? ॥
परीसा संगे लोह सुवर्णा ।
असला भाव कुणा जनाना ? ॥ १ ॥
जरि कां भगें रोख दिलाचा ।
आपुला दोष पुरा कृतींना ॥ २ ॥

एम्. डी वैद्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत सं. क्रमांक नं. ११५०१ ता. २१।१०।३५

पद १२ वें. ( कवाली ).

एकी जगीं ना मुळीं राहिली ।
शत्रु जयाची आशा बाणली ॥ धृ. ॥
स्वातंत्र्य एकीविणें फोल आशा ।
एकी जगावीण स्वातंत्र्य वेली ॥ १ ॥
खर्ची किती मोहरे आज गेले ।
स्वार्थी जगाला शिरें वाहिलीं ॥ २ ॥
पक्षोपपक्षीं उगा नाडिती हे ।
स्वार्थांध साधु कृति भोंवली ॥ ३ ॥
स्वातंत्र्य घेण्या एकी हवी ती ।
बेकी पुरे आज धुळधाण झाली ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद नं. ६८२८ ठाणे.

प्रमोद.

पद १३ वें. ( रागः—भीमपलास, तालः—त्रिताल. )

पदपंकजा—करुणाघना बुडले हें जन संसारी मोहना ॥धृ.॥
बोल बोबडे बाल मुखींचें ॥
गोड करा हृदयांत । जन हो ॥ १ ॥

एम्. डी. वैद्य.

पद १४ वें. ( राग–बागेश्री, ताल–त्रिताल. )

येई त्वरित गोपाला आतां । दीन जनांचा असशी त्राता ॥धृ ॥
संकट कालीं तुजसी स्मरतां ॥
भव दुःख तव तूंची नीवरता ॥ १ ॥

ए. के. ठाकुरदास.

---

पद १५ वें. ( राग–मालकौस, ताल–त्रिताल. )

येई आतां यदु नंदना ।
झणीं धांवना अधीऱ्या मना ।
ब्रीजवासी तूं जगत्जीवना ।
रुसलासी कां शाममोहना ॥ १ ॥

ए. के. ठाकुरदास.

---

पद १६ वें.

तोडुनी बेडी दास्याची ही । स्वातंत्र्या चल घेई ॥झणीं॥धृ॥
मान्य तुजला दास्य हें कां ॥ सौख्य राही भासलें कां ॥ ?
कृति वीरांची कोठें गेली ॥ झोंप नको असली ही ॥ १ ॥
काय तुजला ठेवियेले ॥ मागिलें तें काय दिधलें ॥
घोर निराशा झाली सागे ॥ स्वातंत्र्य चल घेई ॥ २ ॥

प्रमोद.

---

पद १७ वें. ( राग- तीलक कामोद ताल–एकताल )

आंमुचे जें पारतंत्र्य । परक्यांचें तेंहि दास्य ॥
लांछन हें खास होय ॥ धृ. ॥

धांवुनि ये श्रीहरी । हा कलंक दूर करी । तारक तूं मायबाप ।
सांग हरी कोण अन्य ॥ १ ॥

आ. दि. वेल्हाळ, ( दास अनंत. )

---

पद १८ वें. ( चालः—सरकारी नोकरी )

दुनिया निराळी जहाली, बाबा इंग्रजी चाली ॥ धृ. ॥
शिक्षण शिकुनी बुद्धि चळली ।
जाती धर्म ना कर्म उरली ।
देव देव ते भिती न राहिली ।
कोणाची चाड कुणा नच उरली, फॅशन झाली ॥१॥
सारासार विचार कुणाला ।
मुळीं न राहिली तुम्हा आम्हांला ॥
फाजील दुर्गुण अंगीं जडला ।
अनितीची लाट उसळली, हो हो फॅशन नडली ॥२॥
पगार मिळतो बारा तेरा ।
श्रीमंतासम करिती नखरा ॥
अंगामध्यें रेशमी सदरा ।
स्पेशल सूटची घाली, हो हो फॅशन जाहली ॥३॥
शेतकऱ्यांना बुद्धि सुचली ।
सोडुनी खेडीं शहरें धरिली ॥
गिरणीमध्यें नोकरी केली ।
गांवची शेतकी मेली, हो हो फॅशन जाहली ॥४॥
दारु, सिनेमा, सदा असलीं ।
अघोर व्यसनें सर्वां जडलीं ॥

आई बापांची किंमत नुरली ।
सुधारणाहि जाहली हो हो फॅशन नकली ॥९॥
व्यापारी करी कॉंपिटिशन ।
आपसांमध्यें मिरविती भूषण ॥
कमवी शेंकडा दोन कमिशन ।
खर्चानें दुकान बसली, हो हो फॅशन नडली ॥६॥
ऐसी जाहली स्थिती विलक्षण ।
सुधारणाहि याला कारण ।
अजुनी सांभाळा आपुलें धन ॥
सत्वाची वेळ ही आपुली, आली हो हो फॅशन नडली ॥७॥
विठ्ठल सुत कवि विनवी सकलां ।
अविचारानें देश बुडाला ।
सुधारणेला मारा टोला ॥
सुखवी मायभू आपुली, हो हो फॅशन नकली ॥८॥

द. वि. क्षीरसागर

---

Agaya Narayan Daupeti H. No. 151 Poona.

# आगय्या नारायण दुंपेटी.

गंज पेठ, १५१ पुणें शहर

आमच्या कारखान्यांत चंदेरी, महेश्वरी, खंबायती, बडोदे वगैरे सर्व तऱ्हेचे जरीकाठीं रेशमी व मसराइज् गर्भ रेशमी व पक्क्या रंगाची लुगडीं व पातळें हात-मागावर तयार झालेला माल योग्य भावांत मिळेल.

स्थल प्रत

॥ श्रीगणेशायनमः ॥

# समाज सेवक

मुकुंदः— सनातनी ( रामकृष्ण )
मुरलीधरः— सुधारक ( सोमनाथ मळेकर )
मुरारीः— कारखानदार ( श्रीहरी हुबळी )
मधुकरः— बातमीदार ( आत्माराम हुबळी )

## संवाद

मुकूंदः—नमस्कार, मुरलीधर.

मुरलीधरः—नमस्कार--नाहीं गुडनाईट.

मुरारीः—नमस्कार--नाहीं, गुडनाईट--नाहीं, रामराम.

मुरलीधरः—हा जुलमाचा रामराम नको आहे.

मुरारीः—हा सक्तीचा नमस्कार कशाला ?

मुकूंदः—जुलूमाचा रामराम पत्करला, पण सुधारकी गुडनाईट महाग पडेल.

मधुकरः—खरोखरच महाग पडेल. आमच्या छापखान्यांत नमस्कार, रामराम, हे शब्द चटकन जुळवतां येतात.

मुकूंदः—पण गुडनाईट, गुडमॉर्निंग, किंवा गुडइव्हिनिंग, गुडडे, हे शब्द जुळवितांना कित्येक शब्दांचे हातपाय मोडावे लागतात.

मुरारीः—अरे शब्दाबरोबर आमचेही हातपाय त्यांनीं मोडले आहेत.

**मुरलीधरः**—रानवट तुम्ही ! तुम्हांला त्या शब्दांची किंवा चालीरीतींची गोडी नाहीं.

**मधुकरः**—तोंडाला मिट्ठी बसणारी गोडी आम्हांला नको आहे.

**मुकुंदः**—आजपर्यंत चालत आलेले जुनेपुराणे धोपट मार्गच बरे.

**मुरलीधरः**—मग डांबरी रस्त्यावरून चालतांना, डोक्यावर पाय द्या.

**मुरारीः**—तसं करण्याचं कारण नाहीं. ती व्यवस्था आमच्या पैशानं केली जाते.

**मधुकरः**—माल त्याचे हाल आणि कोल्हे कुत्रे खुशाल.

**मुकुंदः**—तुम्ही सुधारकांनींच त्याचा उदो उदो केलांत, म्हणून नाइलाजानें तुम्हीं आमचे देशबंधू म्हणून त्या मार्गावरून आम्हाला चालाव लागत.

**मुरलीधरः**—म्हणजे नाखुषीनं कां होईना, सुधारणा तुम्हाला मान्य आहे तर.

**मुकुंदः**—मुळींच नाहीं. सुधारणेच्या बंडानं देवधर्मांवर पाणी पडलं.

**मधुकरः**—आम्ही बुट पाटलोणी घातल्याशिवाय, आम्हाला कोणी बातम्या पुरवीत नाहीं.

**मुरारीः**—आणि आम्हीं रक्ताचं पाणी करून विणलेल्या कपड्याला बाजारांत किंमत नाहीं.

**मुरलीधरः**—असं आहे तरी तुम्ही घमेंडींत अहांत. एकमेकांचीं डोकीं फोडायला एका पायावर तयार असतां.

स.क्रां०५ ११५७

पद

उगी भांडतां । आपसांत कां ।
सोडुनी द्यावी । अवघी कुशंका ॥ धृ. ।.
एकी करोनी । निजदेश कार्यी ।
जन ढंगीं भुलला । मुकला सुखां ॥ १ ॥

**मुकूंदः**—ही सुधारकांची नक्कल.

**मधुकरः**—हीच त्यांची विलायती अक्कल.

**मुरारीः**—परदेशी तलम पातळांना, विलायती अलपाकला, शेंकड्यांनीं रुपये मोजतां आणि आम्हीं दहा रुपये किंमत मागितली कीं कपाळाला आठ्या घालतां.

**मुकूंदः**—तीर्थयात्रा, श्राद्ध, पर्वणी आवडत नाहीं.

**मधुकरः**—पण हॉटेलांतील रोजची चक्कर चुकत नाहीं.

**मुरारीः**—आतांशा पैठणी, पितांबर विणण्याची पाळी आमच्यावर येत नाहीं.

**मुकूंदः**—धोतर आंगरख्याला किंमत नाहीं.

**मधुकरः**—दाढीमिशीची पर्वा नाहीं.

**मुरलीधरः**—हा कंठशोष करण्यांत काय अर्थ आहे. सुधारणा सुधारणा म्हणून, तिच्या नांवानं बोटं मोडतां.

**मुकूंदः**—कां मोडूं नयेत. घरादाराची राखरांगोळी झाली.

**मधुकरः**—मग तुमच्या घरांत चमकी ब्लाऊज कां दिसतात. असं यांचं म्हणणं आहे.

**मुरारीः**—मुकूंद तुम्हीं सुद्धां अलीकडे पगडी टाकून टोपी घालतां; कांहो असं ?

**मुकुंदः**—आणि तुम्हीं हातमागाचे कारखाने बंद ठेवून गिरणीकडे धांव घेतां; कांहो तसं ?

**मुरलाधरः**—जशास तसं स्वदेशी धंद्यावर पोट भरत नाहीं. जुने रीतीरिवाज पाळून समाज विचारीत नाहीं.

**मधुकरः**—तुम्ही तसं म्हणणारच. तुम्हांला फ्याशनची आवड आहे-

**मुरारीः**—तेव्हां शेपूट तुटलेल्या कोल्ह्याप्रमाणें तुमची अवस्था होणारच.

**मुकुंदः**—आणि शेवटीं कर्जबाजारी होऊन अफू खाऊन मरणारच.

पद ( चाल—मनवेडे कैसे )

जगीं नाचे कैसी सुधारणा ।
उधीळती पैसा चैनी नाना
सुचती रुचतीना ॥ धृ. ॥
काय लागला छंद मनीं । दिसे जगाला ध्यानीं मनीं
पडे भूल कां अकरणी । गोर गरीबां अन्न मिळेना
मरती जगतीना ॥ १ ॥

**मधुकरः**—म्हणून म्हणतो स्वदेशीची शपथ घ्या. उद्यांच्या वर्तमानपत्रांत तुमचा फोटो छापतों.

**मुरारीः**—आणि मी हातमागावर विणलेला कपडा, तुम्हाला बक्षिस देतों. पहा गरिबाची हिंमत.

**मुकुंदः**—आणि मी तुमच्या देवावर फुकट एकादष्णी करतों. पहा तुम्ही गम्मत.

मुरलीधरः—कोणी कांहीं करूं नका. आणि सुधारणेची निंदा करूं नका. माझ्या सुधारणेला हसतां, आणि तुम्ही त्यांत घुसतां.

मधुकरः—हो दुसऱ्याला उपदेश करणारांनीं, स्वतःच वर्तन शुद्ध ठेवावं, असंच नाहीं तुमचं म्हणणं.

मुरलीधरः—अहो धर सोडे. चर्पटपंजिरी पुरे करा !

मुकुंदः—अहो बोलून चालून हा बातमीदार. खऱ्या खोट्या बातम्या छापण्याची याला सवयच.

मुरारीः—आणि तुम्हांला विलायती कपडा वापरायची गरजच.

मधुकरः—त्याशिवाय तुमचं चालतच नाहीं, असं यांचं म्हणणं खरं नाहीं.

मुरारीः—तुमचं काय म्हणणं आहे तें रडा पाहूं दुसऱ्याच्या पंचायती तुम्हाला कशाला ?

मधुकरः—मी समाजसेवक आहे. मला सगळ्यांच्या पंचायती कराव्याच लागतात.

मुरलीधरः—तुम्ही पंचायती केल्या नाहींत तर जग उपाशी मरेल ?

मुकुंदः--जगाशीं याला काय करायचें आहे ? याचा तळीराम गार झाला कीं संपलं.

मुरारीः--कुणांतच राम नाहीं. हराम पुष्कळ सांपडतील.

मुरलीधरः--ही बोलणीं आम्हांला समजतात ! आम्ही काय हरामखोरी केली हो.

मुकुंदः--तें मी सांगतों.

मुरारीः--आपण न बोलाल तर फार बरें होईल.

मुरलीधरः--कां बरं यांनीं बोलूं नये ?

**मुरारी:**—मुलाच्या लग्नांत, यांनीं सगळा विलायती कपडा वापरला.

**मधुकर:**—बरोबर कांहो मुकूंद. याच्या हातमागावरचे कपडे वापरले असते तर मुलाचं लग्न झालं नसतं ?

**मुकूंद:**—हे या गांवठी साहेबांना सांगा. यांनीं आम्हांला धमकी दिली. कारण यांच्या सुधारक मित्राची मुलगी माझ्या मुलाला केली.

**मुरलीधर:**—विलायती माल वापरा, म्हणून आम्ही तुमच्या हातावर गुळ खोबरं दिलं होतं कां ?

**मधुकर:**—गूळ खोबरं नाहीं; पण हातावर दम दिलात ना ?

**मुरारी:**—मग काय करणार ? भ्याला विचारा.

**मुरलीधर:**—म्हणूनच तुम्ही सुधारणेला लायक नाहीं.

**मधुकर:**—हो त्याला तसंच कांहीं असावं लागतं.

**मुकूंद:**—अहो गप्प बसायचं काय घ्याल ?

**मधुकर:**—मी मागेन ते तुमच्या पैकीं कुणीही देणार नाहीं, असं मी जोरानं म्हणतों.

**मुरारी:**—मागा ! मागा ! ऐकूं द्या तर खरं.

**मुरलीधर:**—अहो समाजसेवक, बोला आपली काय इच्छा आहे ?

**मुकुंद:**—मित्रा बोल, बोल.

**मधुकर:**—ऐका ! माझ्या मित्रांनो ऐका ! माझ्या देशबंधूंनो ऐका ! माझ्या माय बहिणींनो............

**मुरलीधर:**—बोला तुम्ही सभ्य गृहस्थांनो.

**मुकूंद:** द्या व्याख्यान देश भक्तांनो.

**मुरारी:** सगळ्यांच्या प्रस्तावना पुरे झाल्या. हे माणसाच्या अवतारा, बोल.

स. नं.
ता.

मधुकर:—श्रीगणेशायनमः गजाननायनमः मोरयायनमः.

मुकुंद:—अकलेच्या खंदका, आम्हाला गणपतीचीं सगळीं नांवें पाठ आहेत.

मुरारी:—लंबोदरायनमः, हेरंबायनमः वगैरे.

मुरलीधर:—हे सनातन बातमीदार, कारखानदारांनो.

तिघे:—काय म्हणतां सुधारकांनो.

मुरलीधर:—सुधारणेचा, जयजयकार करा.

मुकुंद:—आणि खुशाल उपाशी मरा.

मधुकर:—फाजीलपणा पुरे करा. आणि आपसांतले झगडे मिटवा.

मुकुंद:—कुणी कुणाच्या धर्मावर टीका करूं नका.

मुरलीधर:—प्रत्येकाला आपल्या धर्माचा अभिमान आहे, तसाच मला सुधारणेचा.

मधुकर:—काय ?

मुरलीधर:—अभिमान आहे.

मुरारी:—तसा आपल्या देशांतल्या धंद्यांचा अभिमान धरा, घरांतला पैसा घरांतच ठेवा.

मधुकर:—यांतच आपल्या देशाचें कल्याण आहे, ताजी बातमी एक पैसा.

मुकुंद:-बोला मुरलीधर, सुधारणा सोडणार ना ?

मुरलीधर:—मी सुधारणा सोडीत नाहीं. तुम्हीहि स्नानसंध्या सोडूं नका.

मुरारी:—मग मीहि माझा हातमागाचा कारखाना सोडीत नाहीं. आज नाहीं उद्यां देशी कापडाला भाव येणारच येणार !

पद ( चाल--चल लगबग )

किती सुखकर मार्गदर्शित । सुखवी जिवाला
निश्चय हा दृढ केला । येई समज विजय रुचित
सुखद सदन मी करीता । समज विजय झाला ॥ १ ॥

**मधुकर**:--शाबास हे ऐकून मला आनंद झाला उद्याच्या वर्तमानपत्रांत तुमचे तिघांचे फोटो छापतो.

**तिघे**:--आमचे ब्लॉक तुमच्या खर्चानेच करा.

**मधुकर**:--रस्ता धरा हे तुम्हाला खर वाटल कीं काय? अरे ही गणपतीच्या मेळ्यांतील गम्मत!

REFBK-0005762
REFBK-0005762

समाप्त.

---

पद ( भैरवी )

रुसवा कां धरिला मोहना । धाव मधुसूदना पावना ॥
तारी तूं आम्हां क्षणीं येऊनी । कां रुसला यदुनंदना कान्हा ॥

---

चाल ( ब्यॉंडची )

ऐका बंधुनो फॅशन आली आपल्या देशांत ।
परदेशाचा माल घेती हिंदुस्थानांत ॥ धृ. ॥
आई बापाची लेक लाडकी राहे थाटांत ।
पैका सर्वा घालवी तुमचा आहे आनंदांत ॥१॥ परदेशाचा
त्यांचा ड्रेस तुम्हीं पहा कपडा विलायत ।

खादी कपडा घालण्यासी लाज वाटत ॥२॥ परदेशाचा
कॉलर नेकटा गळ्यास बांधुन हॅट डोइत ॥
वडिला देखत मिशा काढून नट नटी होत ॥३॥ परदेशाचा
स्त्रीयानें तर ताळ सोडीला ड्रेस रंगीत ॥
पंच रंगी शूर जोडपें हिंडे शहरांत ॥४॥ परदेशाचा
सोडा नाटकी चाळे आजला हानी देशांत ॥
कॉंग्रेस खादी घाला आंगीं राष्ट्राचें हित ॥५॥ परदेशाचा

चाल ( भैरवी )

धाम सुखद मंगल मय । स्तवूनी वंदू दिव्य पाय ॥ धृ. ॥
विघ्न हरे जया लाभत । खास सुयश हे अविरत ॥
स्वकुल साळी युवक वंदी । शुभद समई दिव्य पाय
लाभोजय ॥१॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. ५५८६५


## पुण्यांत स्वस्त माल मिळण्याचे

### --० एकच ठिकाण ०--

१ फॅन्सी स्टोअर्स.
२ न्यू फॅन्सी स्टोअर्स
३ न्यू फॅन्सी जनरल स्टोअर्स

आमचे दुकानीं सर्व तऱ्हेचा फॅन्सी माल व्यापारी भावानें मिळेल.

प्रोप्रायटर:—आर. जी. धुळे ॲन्ड ब्रदर्स.
न्यू फॅन्सी स्टोअर्स, लक्ष्मी रोड, पुणें नं. २.